N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** जालना **P.S.(ठाणे):** तालुका जालना **Year (वर्ष):** 2021

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0093 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 26/02/2021 23:29 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार **Date From (दिनांक पासून):** 26/02/2021

**Time Period (कालावधी):** पहर 7 **Date To ( दिनांक पर्यंत):** 26/02/2021

**Time From (वेळेपासून):** 19:00 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 19:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 26/02/2021 **Time (वेळ):** 23:16 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 037 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 26/02/2021 23:16 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पूर्व, 01 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** बालाजी हटेल, अंबड चौफुली, ,जालना

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री. कपुरचंद फुलचंद राठोड

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1963 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लघु पाटबंधारे, उपविभाग, अंबड,ता अंबड जि जालना ,अंबड ,जालना,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लघु पाटबंधारे, उपविभाग, अंबड,ता अंबड जि जालना ,अंबड ,जालना,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-9422724641

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | लोकसेवक श्री. महेश बाळकष्ण रामदासी | | | 1. पाटबंधारे विभाग, जालना,तालुका जालना,जालना,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | लाचेची रक्कम न्ध्रासिन पावडर लागलेली . | 3,000.0 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 3,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,जालनादिनांक 26.02.2021.मी कपुरचंद फुलचंद राठोड, वय 58 वर्ष, व्यवसाय नोकरी शिपाई, लघु पाट-बंधारे उपविभाग, अंबड, ता.अंबड, जि.जालना. मुळ गाव रामनगर तांडा, ता. अबंड, जि. जालना मो. नं. 9422724641, 8668594753.समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणी नोकरीस असुन शिपाई यापदावर काम करतो. मला तीन मुले असुन त्यांची नावे विनोद, दिपक, राजु असे आहेत. यातील विनोद व दिपक यांची लग्ने झालेली असुन राजु याचे लग्न दि.15/01/2021 रोजी असल्यांने मी माझे भविष्य निर्वाह निधीमधुन नापरतावा रक्कम रु.3,50,000/- रु. काढण्यासाठी उपविभागीय अधिकारी, लघु पाटबंधारे उपविभाग, अंबड यांचे कडे दिनांक 01/12/2020 रोजी अर्ज सादर केला होता. त्यानुसार उपविभागीय अधिकारी, अंबड यांनी सदरचा अर्ज त्यांची शिफारस करुन मंजुरीसाठी दिनांक 17/12/2020 रोजी कार्यकारी अभियंता, विभागीय कार्यालय, लघु पाटबंधारे विभाग, जालना यांचे कार्यालयाकडे पाठविला होता. त्यानुसार मी सदर कार्यालयास मुलगा राजु यांचे लग्न असल्याने भविष्य निर्वाह निधीचे नापरतावा रक्कम का मंजुर झाली नाही याबाबत वेळोवेळी चौकशी केली असता तेथील कनिष्ठ लिपीक श्री रामदासी व वरिष्ठ लिपीक श्रीमती फेदराम मडम यांनी मला उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यादरम्यान माझा मुलगा नामे राजु यांचे लग्न दि. 15/01/2021 रोजी झाले. सदर लग्नासाठी भविष्य निर्वाह निधीचे नापरतावा रक्कम न आल्याने मी माझ्या नातेवाईकांकडुन हातउसने पैसे घेतले होते. त्यानंतर दिनांक 22/02/2021 रोजी माझ्या भविष्य निर्वाह निधीचे नापरतावा रक्कमेच्या मंजुरीची चौकशी करण्यासाठी कार्यकारी अभियंता, विभागीय कार्यालय, लघु पाटबंधारे विभाग, जालना येथे जाऊन तेथील संबंधीत कनिष्ठ लिपीक श्री.रामदासी यांना भेटलो व माझ्या भविष्य निर्वाह निधीचे नापरतावा रक्कम मंजुरी बाबत चौकशी केली असता कनिष्ठ लिपीक श्री.रामदासी यांनी मला सार्गितले कि,तुमचे भविष्य निर्वाह निधीचे नापरतावा रक्कम मंजुर करावयाची असल्यास तुम्ही मला 3,000/- रु.दयावे लागतील त्यातील 2,000/-रु. अधीक्षक अभियंता कार्यालय, पाटबंधारे विभाग, औरंगाबाद येथील वरिष्ठ लिपीक श्री. मोटे यांना दयावे लागतील व 1,000/- रु.मला लागतील अशी लाचेची मागणी केली. त्यावेळी माझ्या जवळ पैसे नसल्यांने मी नंतर आणुन देतो असे सांगीतले.माझी लघुपाटबंधारे विभाग, जालना कार्यालयातील कनिष्ठ लिपीक श्री.रामदासी यांना लाच द्यायची इच्छा नाही परंतु लाच दिली नाही तर ते माझे भविष्य निर्वाह निधीतील नापरतावा रक्कम मंजुर होऊ देणार नाहीत. श्री.रामदासी साहेब यांचेशी माझी वैयक्तीक दुश्मणी नाही, अगर देण्याघेण्याचा अथवा उसनवारीचा आर्थीक व्यवहार नाही. श्री. रामदासी साहेब हे माझ्याकडे मागत असलेले पैसे लाचेचे असल्याचे मला माहित आहे. मी श्री रामदासी साहेब, कनिष्ठ लिपीक, कार्यकारी अभियंता,लघु पाटबंधारे विभाग कार्यालय, जालना यांना भेटण्यासाठी त्यांचे कार्यालयात जाणार असुन त्यावेळी मी त्यांना माझे भविष्य निर्वाह निधीतील नापरतावा रक्कम मंजुर करुन देण्याबाबत विनंती करणार आहे. त्यावेळी श्री.रामदासी साहेब यांनी मला लाचेची मागणी करुन ते स्वत: किंवा इतरा मार्फत स्विकारल्यास त्यांना पकडून कार्यवाही करावी. अशा

मजकुरांची तक्रार दि.22.02.2021रोजी दिली होती.त्यावरुन ला.प्र.वि.जालना येथील पोलीस निरंीक्षक श्री.ताटे यांनी दिनांक 22/02/2021 रोजी माझी तक्रार लेखी व टंकलीखीत करुन पंचाची ओळख करुन देवुन माझी तक्रार त्यांना सांगीतली होती. माझ्या तक्रारी वरुन मी श्री.रामदासी साहेब यांचे विरुध्द केलेली तक्रार खरी आहे काय व श्री.रामदासी साहेब हे माझ्याकडे लाच मागतात काय याची खात्री करण्यासाठी,लाचेच्या मागणीची पडताळणी करण्यासाठी मला व पंच अब्दुल करीम कुरेशी यांना कार्यकारी अभियंता, लघु पाट बंधारे विभाग, जालना येथे श्री रामदासी साहेब यांना भेटण्यासाठी पाठविण्यात आले. त्यावेळी माझ्याकडे व्हाईस रेकर्डर मशीन सुरु करुन देण्यात आले होते. त्यावेळीचे भेटी मध्ये मी माझ्या भविष्य निर्वाह निधीतील नापरतावा रक्कम मंजुर करण्यासाठी श्री रामदासी साहेब यांचेशी चर्चा केली असता श्री. रामदासी साहेब यांनी माझ्याकडे माझे भविष्य निर्वाह निधीतील नापरतावा रक्कम 3,50,000 रु मंजुर करण्यासाठी मला 1,000 रु व अधिक्षक अभियंता, लघु पाटबंधारे विभाग कार्यालय औरंगाबाद येथील वरिष्ठ लिपीक श्री मोटे यांचे 2,000 असे 3,000/-रुपयाची लाचेची मागणी करुन लाच स्विकारणार असल्याचे निष्पन्न झाले.तसा सविस्तर पंचनामा करण्यात आला. त्यावरुन दिनांक 26.02.2021 रोजी मी श्री ताटे साहेब व ला.प्र.वि.जालना येथील स्टफ व पंच यांचे समक्ष मी श्री.रामदासी यांना माझ्या मोबाईलवरुन फोन केला असता त्यांनी मोबाईल फोनवर मला सांगीतले की, मी घरी आलो आहे, तुम्ही अंबड चौफुली येथील अबंड रोडवरील बालाजी हटेल येथे या असे कळविल्यावरुन पोलीस निरंीक्षक श्री. ताटे साहेब यांनी श्री रामदासी साहेब यांचे विरुध्द अबंड रोडवरील बालाजी हटेल येथे सापळा लावण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर मोतीबाग जवळील उड्डान पुलाचे बाजुला अंबड चौफुलीकडे जाणा-या रोडवर सुरक्षीत ठिकाणी शासकीय वाहनामध्ये अंथ्रासीन पावडर व अल्ट्राव्हाईलेट लम्प यांची माहीती देवुन मला व पंचांना त्याचे प्रात्यक्षीक दाखविण्यात आले. कनिष्ठ लिपीक श्री रामदासी साहेब यांना लाच म्हणुन देण्यासाठी माझ्याकडील पैशातुन 3000/- रु वेगळे काढले व त्याला अंथ्रासीन पावडर लावली. श्री.रामदासी साहेब यांना देण्यासाठी थ्रसीन पावडर लावलेले पैसे माझ्या नेहरु शर्टच्या उजव्या खिशात ठेवले. सापळा पथकातील सर्वांना त्यांचे काम समजावुन सांगुन सुचना देण्यात आल्या. तसेच पोलीस निरीक्षक श्री ताटे साहेब यांनी मला सुचना दिली की, श्री.रामदासी यांनी लाच स्वीकारल्यानंतर तुम्ही तुमच्या तोंडाला लावलेला मास्क काढुन डाव्या खिशात ठेवायचा याबाबतचा पंचासमक्ष सविस्तर पंचनामा करण्यात आला. त्यानंतर मला व पंच नं 1 अब्दुल करीम कुरेशी यांना कनिष्ठ लिपीक श्री.रामदासी यांना भेटण्यासाठी अंबड चौफुली येथील अबंड रोडवरील बालाजी हटेल येथे पाठविले. त्यानंतर मी व पंच अब्दुल करीम कुरेशी असे माझ्या मोटार सायकलने अंबड चौफुली कडे निघालो आमच्या मागेच पोलीस निरीक्षक श्री. ताटे साहेब व सर्व स्टफ तसेच पंच नं 2 श्री. सोपान टेपले असे आले व श्री. रामदासी यांचे विरुध्द अंबड चौफुली येथील अबंड रोडवर बालाजी हटेल येथे सापळा लावण्यात आला. सर्व जण एकमेकांना दिसतील अशा प्रकारे थांबले. तेव्हा मी बालाजी हटेल मध्ये गेलो. माझ्या पाठीमागे पंच क्रमांक 1अब्दुल करीम कुरेशी असे येवुन बालाजी हटेलमध्ये जाऊन बसलो. सापळा पथकातील पोलीस निरीक्षक श्री. ताटे साहेब व स्टाप असे तेथे आले असतांना तेथे बालाजी हटेलमध्ये श्री. रामदासी साहेब आले. त्यावेळी त्यांनी माझेकडुन सायं.07.00 वा.सुमारास माझी भविष्य निर्वाह निधीची मी औरंगाबाद येथील कार्यालयातुन आणलेली ऑर्डर व लाचेची रक्कम 3,000 रु स्वीकारली. त्यानी माझ्याकडुन स्वीकारलेली लाचेचे रक्कम 3,000 रु घेवुन त्यांचे हातातील मी दिलेल्या आर्डरमधील कागदात गुंडाळुन ठेवली. त्यावेळी पंच 1अब्दुल करीम कुरेशी हे समक्ष हजर होते. त्यानंतर मी सापळा पथकास आधी ठरल्या प्रमाणे माझ्या तोंडाला लावलेला मास्क काढुन डाव्या खिशात ठेवला तेव्हा पोलीस निरीक्षक श्री.ताटे साहेब व स्टफ तसेच पंच नं.2 श्री. सोपान टेपले असे लगेच पाठीमागुन त्याठिकाणी येवुन कनिष्ठ लिपीक श्री.रामदासी यांना ताबडतोब पकडले. पोलीस निरीक्षक श्री. ताटे साहेब यांनी श्री.रामदासी यांना त्यांची स्वत:ची व सर्वाची ओळख करुन दिली. कनिष्ठ लिपीक श्री. रामदासी यांना त्यांचे नाव विचारले असता त्यांनी त्यांचे पुर्ण नाव महेश रामकृष्ण रामदासी, वय 39 वर्षे, कनिष्ठ लिपीक, कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग कार्यालय, जालना असे सांगीतले.तेव्हा त्यांनी स्वीकारलेली लाचेची रक्कम 3,000 रुपये व माझ्या आर्डरचा कागद पंच क्र 2 सोपान टेपले यांना ताब्यात घेण्यास सागिंतले. मला पोलीस निरीक्षक श्री.ताटे साहेब यांनी सरकारी गाडी जवळ बोलावुन त्याठिकाणी माझे जवळील व्हाईस रेकर्डर कर्मचारी श्री.सचिन राऊत यांनी बंद केला व माझे हात तपासण्यात आले. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. ताटे साहेब, स्टाफ, दोन्ही पंच, मी व श्री.रामदासी यांना सोबत घेवुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना येथे आलो. सर्व घटने बाबतचा सविस्तर पंचनामा करण्यात आला.तरी दिनांक 26.02.2021 रोजी 19.00 वा. अंबड चौफुली येथील बालाजी हटेल, अबंड रोड येथे श्री.रामदासी यांनी माझे भविष्य निर्वाह निधीतील नापरतावा रक्कम मंजुर करुन देणेसाठी पंच 1 श्री. अब्दुल करीम कुरेशी यांचे समक्ष 3,000/- रुपयेची लाच स्विकारली तेव्हा त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे. म्हणुन त्यांचेवर कायदेशीर कार्यवाही करावी ही विनंती.कपुरचंद फुलचंद राठोड

13.**Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** YASHWANT MADHU BAGUL(I (Inspector)) / POBN71157 **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
**Rank (पद):**
**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): YASHWANT MADHU BAGUL
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): POBN71157